**ठळक बातम्या**

- पश्चिम सीमेजवळ पाकिस्तानचे हल्ले भारतानं यशस्वीपणे रोखले
- युद्धस्थितीत पाकिस्तान जाणूनबुजून अफवांचा आधार घेत असल्याचा भारताचा आरोप
- जैश ए मोहम्मद आणि लष्कर ए तैयबाचे ५ दहशतवादी ऑपरेशन सिंदूरमधे ठार
- महाराष्ट्र आणि मध्यप्रदेश दरम्यान तापी खोरे मेगा रिचार्ज प्रकल्पाच्या करारावर आज होणार स्वाक्षऱ्या

**आणि**

- प्रसिद्ध रंगभूषाकार विक्रम गायकवाड यांचं निधन

**<><><><><>**

पाकिस्तान सातत्यानं करत असलेली घुसखोरी आणि ड्रोन हल्ल्यांना भारतानं चोख प्रत्युत्तर दिलं आहे. भारतीय हवाई दलाच्या विमानांनी हवेतून जमिनीवर मारा करणाऱ्या शस्त्रांचा वापर करत पाकिस्तानच्या रफिक्की, मुरीद, चक्लाला, रहिमयार खान या ठिकाणची लष्करी केंद्रं, नियंत्रण केंद्रं, रडार आणि शस्त्रसाठ्यांवर हल्ले करत ती उद्धवस्त केल्याची माहिती आज नवी दिल्लीत झालेल्या विशेष वार्ताहर परिषदेत देण्यात आली. परराष्ट्र सचिव विक्रम मिसरी, कर्नल सोफिया कुरेशी, विंग कमांडर व्योमिका सिंग यांनी ही वार्ताहर परिषद घेतली कुरेशी यांनी सांगितलं....

**होल्ड - बाईट- व्योमिका सिंग/ सोफिया कुरेशी**

तसंच भारतीय हवाई दलाचं सिरसा इथलं केंद्र उद्धवस्त केल्याचा पाकिस्ताननं केलेला दावा पूर्णपणे चुकीचा असून हे केंद्र पूर्ण क्षमतेनं सुरू असल्याचं

सांगत त्यांनी तिथली आजची छायाचित्रं दाखवली. पाकिस्तान सीमाभागात मोठ्या प्रमाणात सैन्याची जमवाजमव करत असल्याचं यावेळी कुरेशी यांनी सांगितलं.

पाकिस्तानकडून होत असलेल्या या कारवाईला भारतीय हवाई दलानं तातडीनं प्रत्युत्तर दिलं. पाकिस्तानची रडार व्यवस्था आणि तंत्रज्ञानाधारित तळ लक्ष्य करत ते उद्ध्वस्त केल्याची माहिती विंग कमांडर व्योमिका सिंग यांनी दिली. भारतातले सुरतगड आणि सिरसा इथले हवाई दलाचे तळ तसंच एस-४०० ही हवाई सुरक्षा प्रणाली नष्ट केल्याचा पाकिस्तानचा दावा सपशेल खोटा असल्याचंही सिंग यांनी सांगितलं.

दरम्यान, सीमावर्ती भागात पाकिस्तानकडून सातत्यानं गोळीबार केला जात आहे. या गोळीबारात राजौरीचे अतिरिक्त जिल्हा आयुक्त राज कुमार थापा यांच्यासह दोन नागरिकांचा मृत्यू झाल्याची माहिती परराष्ट्र सचिव विक्रम मिसरी यांनी यावेळी दिली. पाकिस्तान सातत्यानं चुकीच्या बातम्या पसरवत असल्याचंही मिसरी यांनी नमूद केलं.

**<><><><><>**

पाकिस्तानच्या कुरापती भारतानं रोखल्यामुळे पाकिस्तान डिजिटल माध्यमांवर अफवा आणि चुकीची माहिती पसरवत आहे. समाजमाध्यमांवर बनावट प्रतिमा, चित्रफिती प्रसृत करत पाकिस्तान माध्यमांची आणि लोकांची दिशाभूल करत आहे. भारतीय सैनिकांना पकडल्याचा किंवा भारतीय संरक्षण प्रणाली नष्ट केल्याचा खोटा प्रसार पाकिस्तानी समाज माध्यमं आणि वाहिन्यांवर केला जात आहे. तसंच भारतीय प्रत्युत्तरामुळे पाकिस्तानचं झालेलं नुकसानही लपवण्याचा प्रयत्न होत आहे. अशा प्रकारचा कोणताही मजकूर आढळल्यास तात्काळ पत्र सूचना कार्यालयाला याची माहिती द्यावी, ८७९९७११२५९ या व्हॉट्सअप क्रमाकांवर किंवा socialmedia@pib.gov.in या मेलवर असा मजकूर पाठवावा, असं आवाहन केलं आहे.

<><><><>

जैश ए मोहम्मद आणि लष्कर ए तैयबा या दहशतवादी संघटनांचे ५ दहशतवादी ऑपरेशन सिंदूरमधे मारले गेल्याचं अधिकृत सूत्रांनी सांगितलं. मुदस्सर खादियान खास उर्फ अबु जुंदाल, मौलाना मसूद अझहरचा मेव्हणा हाफिज मुहम्मद जमील, मोहम्मद युसुफ अझहर, खालीद उर्फ अबु अकाशा आणि मोहम्मद हसन खान अशी त्यांची नावं आहेत. गेल्या गुरुवारी राबवलेल्या ऑपरेशन सिंदूर मोहिमेत ते ठार झाले.

<><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज नवी दिल्ली इथं आपल्या निवासस्थानी संरक्षण मंत्री राजनाथ सिंह आणि तिन्ही सेना दलांच्या प्रमुखांची बैठक घेतली. राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल देखील बैठकीला उपस्थित होते. भारतानं पाकिस्तानच्या कुरापतींना प्रत्युत्तर देण्यासाठी सुरु केलेल्या कारवाईच्या पार्श्वभूमीवर ही बैठक झाली.

<><><><>

आकाशवाणी मुंबई केंद्रावरून प्रसारित होणाऱ्या काही बातमीपत्रांच्या वेळेत बदल करण्यात आला आहे. त्यानुसार  दुपारी ३ चं प्रादेशिक बातमीपत्र ३ वाजून २० मिनिटांनी, संध्याकाळी पाच वाजता प्रसारित होणारं बातमीपत्र ५ वाजून २० मिनिटांनी तर रात्री ८ वाजून ५ मिनिटांनी प्रसारित होणारं राष्ट्रीय बातमीपत्र ८ वाजून २० मिनिटांनी प्रसारित होईल.  आकाशवाणी मुंबईच्या प्रादेशिक वृत्तविभागाचा कार्यक्रम वृत्तविशेष आणि अर्थविशेष संध्याकाळी सव्वासात ऐवजी रात्री साडेआठ वाजता प्रसारित होईल. पुढील आदेश येईपर्यंत हे बदल कायम राहतील.

<><><><>

महाराष्ट्र आणि मध्यप्रदेश आंतरराज्य नियंत्रण मंडळाची २८वी बैठक आज मध्यप्रदेशची राजधानी भोपाळ इथं होत आहे. यावेळी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि मध्यप्रदेशचे मुख्यमंत्री मोहन यादव  उपस्थित आहेत. जलविद्युत आणि जलसिंचन क्षेत्रातल्या प्रकल्पांवर बैठकीत चर्चा होईल. तापी खोरे मेगा रिचार्ज प्रकल्पाच्या सामंजस्य करारावर आज स्वाक्षऱ्या होणार आहेत. या प्रकल्पामुळे महाराष्ट्राला १९ पूर्णांक ३६ शतांश टीएमसी पाणी मिळणार असून मध्यप्रदेशला ११ पूर्णांक ७६ शतांश टीएमसी पाणी मिळणार आहे. तापी नदीच्या तीन प्रमुख प्रवाहातून कालवे काढून संबंधित क्षेत्राच्या कानाकोपऱ्यात पाणी पोहोचेल. या प्रकल्पामुळे उत्तर महाराष्ट्रातल्या जिल्ह्यांना लाभ मिळणार असून विशेषतः नागपूर शहराची तहान भागणार आहे. ही योजना जगातली सर्वात मोठी जल पुनर्भरण योजना असल्याचं मध्यप्रदेशचे मुख्यमंत्री मोहन यादव यांनी सांगितलं. महाराष्ट्रातली २ लाख ३४ हजार ७०६ हेक्टर जमीन तर मध्यप्रदेशातली १ लाख २३ हजार ८२ हेक्टर जमीन सिंचनाखाली येणार आहे. या प्रकल्पात कोणत्याही गावाचं विस्थापन होणार नाही, असं यादव यांनी सांगितलं. ही योजना केंद्रसरकारच्या जलसिंचन योजनांमधे समाविष्ट करावी, अशी विनंती आपण केंद्रसरकारला करणार असल्याचं ते म्हणाले.

**<><><><><>**

नैसर्गिक संकटामुळे होणाऱ्या शेतीच्या नुकसानीचा समावेश उत्पादन खर्चाच्या पद्धतीत करण्याची आवश्यकता आहे, असं राज्य कृषी मूल्य आयोगाचे अध्यक्ष पाशा पटेल यांनी म्हटलं आहे. राज्य कृषी मूल्य आयोग आणि भारतीय हवामान विभागाची बैठक काल पुण्यात झाली. वातावरण बदलाचा शेती क्षेत्रावर परिणाम या विषयावर या बैठकीत चर्चा झाली. यावेळी पटेल यांनी हे मत व्यक्त केलं.

**<><><><><>**

शाश्वत विकास उद्दिष्ट २०३० ला अनुसरून, भारतात माता आणि बाल मृत्यूच्या दरात सातत्याने घट होताना दिसत आहे. रजिस्ट्रार जनरल ऑफ इंडिया ने जारी केलेल्या अहवाला नुसार, देशात दर एक लाख बालकांच्या जन्मा मागे माता मृत्युदर १३० इतका होता. तो आता कमी होऊन ९३ वर आला आहे. बालमृत्यू दर २०१४ मध्ये ३९ होता, तो २०२१ मध्ये कमी होऊन २७ वर आला आहे. २०१४ मध्ये नवजात शिशु मृत्युदर प्रति १ हजार २६ इतका होता, तो २०२१ मध्ये १९ वर आला.

पाच वर्षां खालच्या बालकांचा मृत्युदर २०१४ मध्ये दर हजार जन्मांमागे ४५ होता, तो २०२१ मध्ये ३१ वर आला.

**<><><><><>**

खेलो इंडिया युवा क्रीडा स्पर्धेत महाराष्ट्र ६६ पदकांची कमाई करत पदक तालिकेत अव्वल स्थानावर आहे. यात २४ सुवर्ण, २१ रजत आणि २१ कांस्यपदकांचा समावेश आहे. कर्नाटक ३८ तर राजस्थान २१ पदकांसह दुसऱ्या आणि तिसऱ्या स्थानावर आहेत.

**<><><><><>**

ज्येष्ठ रंगभूषाकार विक्रम गायकवाड यांचं आज मुंबईत दीर्घ आजारानं निधन झालं. ते ६१ वर्षांचे होते. पानिपत, बेल बॉटम, उरी, दंगल, पिके यासारख्या गाजलेल्या चित्रपटांसाठी, तर पावनखिंड, फत्ते शिकस्त, शेर शिवराज यासारख्या ऐतिहासिक चित्रपटांसाठी त्यांनी रंगभूषाकार म्हणून काम केलं. विक्रम गायकवाड यांना सात वेळा राष्ट्रीय पुरस्कारानं गौरवण्यात आलं होतं. रुपेरी पडद्यावरच्या व्यक्तिरेखेच्या गरजेनुसार कलाकारांच्या चेहऱ्यात आणि रुपरेषेत बदल करण्याची जादू त्यांच्या ब्रशमधे होती. आज दुपारी मुंबईत दादर इथल्या स्मशानभूमीत त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार होणार आहेत.

**<><><><><>**

राज्यातल्या चारही विभागात तुरळक ठिकाणी, विजांचा कडकडाट आणि सोसाट्याच्या वाऱ्यासह पाऊस पडेल, असा हवामान विभागाचा अंदाज आहे.

//<><><><><>//